स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२१–२२/४७५ दि. १८/०२/२०२२

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**फक्त पुणे शहर व पुणे ग्रामिण**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : कोविडमुक्त गाव उपक्रम राबवणेबाबत**

महोदय/महोदया

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा परिषद, पुणे व भारतीय जैन संघटना यांच्या सहकार्यातुन कोविड मुक्त गाव संकल्पना पुणे जिल्ह्यामध्ये रासेयो संलग्नीत पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. याकरिता खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांच्या आधारे सदर उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होईल.

१) उद्दिष्ट्ये : कोविड मुक्त गाव कार्यक्रम हा सामाजिक नेतृत्त्व उपक्रम असलेले समाजातील सर्व स्तरावरील नागरीक या चळवळीद्वारे कोविडमुक्त गाव कार्यक्रमाची जबाबदारी स्विकारतील. हा कार्यक्रम स्थानीक लोकांकरिता उपयुक्त असुन कौशल्यपूर्ण व कायमस्वरूपी आदर्श म्हणून निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे गावातील नागरीकांच्या क्षमता वाढीसाठी रासेयो स्वयंसेवकांच्या माध्यमातून गावामध्ये सहाय्य उपलब्ध करून देता येईल.

२) प्रक्रिया : रासेयो स्वयंसेवकांद्वारे ग्रामकृतीदलाची क्षमता वाढवण्याच्या प्रक्रीयेत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

२–अ) रासेयो विशेष शिबिराद्वारे गावातील नागरीकांना कोविडमुक्त गाव उपक्रमाची माहिती देऊन ग्रामकार्यदल स्थापन करणे. कोविडमुक्त गाव प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सरपंच व ग्रामकृतीदलातील सदस्य यांना प्रोत्साहीत करणे. गावामध्ये कोविड मदत केंद्र स्थापन करण्यासाठी आणि कोविडमुक्त गाव जनजागृती कार्यक्रमांतर्गत पोस्टरद्वारे जनजागृती करून नागरीकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी गावांना व ग्रामस्थांना प्रेरीत करणे.

२–ब) आठवड्यातून एकदा गावांना भेट देणे – ग्रामकृतीदलाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन कामाची उजळणी करणे, तसेच ग्रामकृतीदलांना साप्ताहिक आढावा बैठकीसाठी प्रेरित करणे, बैठकीकरिता नोंदवही तयार करणे, बैठकीच्या नोंदी ठेवणे, अहवाल तयार करणे. ऑनलाईन नॉलेज प्रोग्राम मॅनेजमेंट सिस्टीमवर (https://covidfreevillage.in/#/) माहिती भरण्याबाबत सहकार्य करणे.

३) रासेयो कार्यक्रम अधिकारी यांची जबाबदारी व भुमिका : या कार्यक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी यांची जबाबदारी महत्वाची आहे. कारण रासेयो स्वयंसेवक हा त्यांच्याकडे प्रेरणा, मार्गदर्शक म्हणून पहात असल्याने, कार्यक्रम अधिकारी यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केवल सामाजिक बदलाचे माध्यम होण्यासाठीच प्रेरीत करीत नाहीत तर ग्रामीण विकासाच्या समस्या, आव्हांनासाठी बळकट आणि संवेदनशील व्यक्ती बनवतील. त्यामुळे या उपक्रमात कार्यक्रम अधिकारी यांचा सहभाग व कार्य महत्त्वाचे आहे. पर्यायाने कार्यक्रम अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे जबाबदारी व भुमिका पार पाडावी.

- प्रथम कोविडमुक्त गाव कार्यक्रम तपशीलवार समजून घ्यावा
- कार्यक्रम अधिकारी यांनी रासेयो स्वयंसेवकांना सदर कार्यक्रमाची माहिती देऊन त्यांना सदर उपक्रमास अधिक प्रभावीपणे काम करण्यास प्रवृत्त करावे.
- या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची वेगळी नोंद ठेवावी.

* स्वयंसेवकांना कोविडमुक्त गाव (CFV) प्रशिक्षण द्यावे.
* प्रशिक्षणानंतर संबधित विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या गावामध्ये अथवा महाविद्यालयाच्या जवळील गावामध्ये विभागणीद्वारे काम करण्यासाठी मार्गदर्शन करून गाव नेमून द्यावे.
* सात दिवसीय शिबिरामध्ये तसेच काम करत असलेल्या गावामध्ये आठवड्यातून एकदा भेट देऊन विद्यार्थ्यांनी वरील अनुक्रमे २(अ) आणि २(ब) मधील परिछेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे उद्दिष्ट्ये साध्य केल्याची खात्री करावी.

४. रासेयो स्वयंसेवक यांची जबाबदारी व भूमिकाः कोविडमुक्त गाव कार्यक्रमात रासेयो स्वयंसेवक हा समाजातील बदलाचे माध्यम म्हणून कोविडमुक्त गाव करण्यात महत्त्वपूर्ण आणि रचनात्मक भूमिका बजावतील, त्या अनुषंगाने बजावतात. कोविडमुक्त गाव उपक्रमातील स्वयंसेवकांची विशिष्ट भुमिका खालीलप्रमाणे.

४-अ) विशेष शिबिराच्या माध्यमातून : कोविडमुक्त गाव मार्गदर्शन तत्त्वानुसार यांना सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, गावातील सामाजिक कार्यकर्ते यांना कोविडमुक्त गाव संकल्पना समाजवून राज्यशासनाच्या कोविडमुक्त गाव स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे.

* कोविडमुक्त गाव कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार गावामध्ये ग्रामकृतीदल आणि कोविड मदत केंद्र स्थापनेकरिता गावास सहकार्य व मार्गदर्शन करणे.
* कोविडमुक्त गाव कार्यक्रमाकरिता नॉलेज मॅनेजमेंट सिस्टीम (https://kms.covidfreevillage.in/) मधील प्रशिक्षण मॉड्यूल आणि व्हिडीओ यांचा वापर करून सरपंच, ग्रामसेवक, सामाजिक कार्यकर्ते ग्रामकृतीदलातील सदस्य यांना प्रशिक्षण द्यावे.
* ग्रामटास्क फोर्स सदस्य यांना कोविड जनजागृतीचे पोस्टर्स ग्रामपातळीवर छापून आणि कोविड योग्य वर्तनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी गावात ठिकठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत प्रवृत्त करणे.

४-ब) आठवड्यातून एकदा गावाला भेट देणे -

* ग्रामटास्क फोर्सद्वारे आयोजीत केलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी गावांना भेटी देणे.
* ग्रामटास्क फोर्सच्या सर्व सदस्यांना साप्ताहिक बैठकीसाठी प्रेरीत करणे आणि बैठकीबाबत नोंदी ठेवणे तसेच नॉलेज प्रोग्राम मॅनेजमेंट सिस्टीमवर बैठकीची नोंद, कार्यक्रमाचे फोटो, व्हिडीओ अपलोड करण्याबाबत मार्गदर्शन करणे.

कोविडमुक्त गाव कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वर नमुद केल्यानुसार कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी सहभागी होऊन आवश्यक ती कामे करण्याबाबत सहकार्याची अपेक्षा आहे. आपल्या सहकार्यानेच कार्यक्रमाचे यश अवलंबून आहे. कळावे, ही विनंती.

शुभेच्छेसह.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**